MHKO180003622019

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९०/२०१९ मधील**
**निशाणी क्र.२१ खालील आदेश.**
**(प्रकाश नामपल्ली वि. अशोक नामपल्ली आणि १)**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाद मिळकतींच्या वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दाव्यातील परिच्छेद क्रमांक ४ मधील चौथ्या ओळीत अनावधानाने व टंकलेखनातील दोषामुळे 'सन १९८९' ऐवजी 'सन १९८४' असे नमूद करण्यात आलेले आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीचे खरेदीपत्र हजर केल्यानंतर वादी यांना सदर चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक अनावधानाने, नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे झालेली असल्यामुळे त्याबाबत दाव्यामध्ये व दावा रजिस्टरमध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.२२ वर दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, अर्जामधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. दाव्याचे कामकाज चौकशीच्या अंतीम टप्प्यात आले असून दावा निष्कारण लांबणीवर टाकण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. तसेच, दावा रजिस्टरला दुरुस्ती मागण्याचा कोणताही अधिकार वादी यांना नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे. प्रतिवादींनी वैकल्पीकरित्या असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत न्यायालय आल्यास वादी यांनी केलेल्या दिरंगाईबाबत प्रस्तुतचा अर्ज पन्नास हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करण्यात यावा.

०४. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. दावा, कैफीयत, प्रस्तुत अर्ज तसेच प्रस्तुत अर्जावरील वादी यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता व तुटक कब्जाकरीता दाखल केला आहे.

प्रस्तुतचा दावा दाखल करीत असतेवेळी दाव्यातील परिच्छेद क्र.४ मध्ये 'सन १९८९' ऐवजी 'सन १९८४' असे नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे नमूद करण्यात आल्यामुळे सदर टंकलेखनातील दोष दुरुस्त करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देता येत असली तरी वादी यांना दावा रजिस्टरमध्ये प्रस्तुत अर्जाद्वारे दुरुस्ती मागता येणार नाही. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या मागणीपुरता खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी यांनी दावा दाखल केल्याच्या सुमारे पाच वर्षांनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज एक हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

:: **आदेश** ::

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) इतक्या खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत दाव्यात दाखल करावी. तसेच त्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) ही प्रतिवादींना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2024.07.23 17:44:18 +0530

दिनांक : २३/०७/२०२४
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.